कोल्हापूर विभागीय कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघ बैठकीचे इतिवृत्त दि. १०/१०/२०१९

अ.क.	सर्वसाधारण विषय	करावयाच्या कार्यवाहीचा तपशील	कार्यवाही कोणत्या स्तरावर	कालावधी
१	मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.	मागिल सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.	--	--
२	मागील सभेच्या इतिवृत्तामधील अपूर्ण राहिलेल्या कामकाजासंबंधी चर्चा करुन निर्णय घेणे	मागील सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करुन अपूर्ण राहिलेल्या कामकाजासंबंधी चर्चा करण्यात आली.	--	--
३	दि. २ मे २०१२ नंतर नियुक्ती पहिल्या टप्प्यातील ७० व नंतरच्या टप्प्यातील १४१ शासनाकडून प्राप्त झालेल्या यादीमधील किती शिक्षकांच्या मान्यता झाल्या? माहिती घेणे तसेच किती शिक्षकांच्या मान्यता अद्यापही प्रलंबित आहेत? चर्चा करणे.	दि. २ मे २०१२ नंतर नियुक्ती पहिल्या टप्प्यातील ७० पदांपैकी ६८ पदांच्या मान्यता झालेल्या आहेत. २ महाविद्यालयातील प्रस्ताव प्रलंबित आहेत. १) एस.के.पाटील, करुंदवाड व २) वि.स.पांगे, तासगांव या दोघांना त्रुटी पूर्तता करणेकामी कळविण्यात आलेले आहे. त्रुटी पुर्तता झाली नसल्यामुळे अद्याप प्रलंबित आहेत. त्रुटी पूर्तता झाल्यास प्रस्ताव निकाली काढण्यात येतील. नंतरच्या टप्प्यातील १४१ पदांपैकी पुढील महाविद्यालयातील प्रस्ताव प्रलंबित आहेत. १) बाबासाहेब देशमुख माविद्यालय, आटपाडी :- ०२ २) एम.आर.हायस्कूल, गडहिंग्लज :-०२ ३) अभ्यंकर कुलकर्णी महाविद्यालय, रत्नागिरी :-०१ ४) डी.बी.जी. ज्युनिअर कॉलेज :-०१ ५) हु.किसन अहिर, वाळवा :-०१ ६) आवळेगाव हायस्कूल, आवळेगाव :- ०१ ७) वारणा महाविद्यालय, वारणा :- ०१ ८) एस.एम.हायस्कूल व ज्यु. कॉलेज :- ०२ ९) गोखले कॉलेज :- ०३ १०) शाहू कॉलेज कागल :- ०१ उपरोक्त प्रस्तावांपैकी पुढील ०६ प्रस्ताव कार्यवात आहेत. १) गोखले कॉलेज :- ०२ २) शिये हायस्कूल, शिये :- ०१ ३) उत्तूर हायस्कूल, उत्तूर :- ०१ ४) कणकवली कॉलेज :- ०१	शिक्षण उपसंचालक स्तरावर	--

		५) शाहु कॉलेज, कागल :-०१ १२ प्रस्तवामध्ये त्रुटी पुर्तता झाली नसल्यामुळे अद्याप प्रलंबित आहेत. त्रुटी पूर्तता झाल्यास प्रस्ताव निकाली काढण्यात येतील.		
४	सन २०१८-१९ मधील प्रॉव्हीडंट फंड स्लिपा व डी.सी.पी.एस. धारकांच्या स्लीपा वाटप पूर्ण झाले आहे का ? नसेल केव्हापर्यंत पूर्ण होईल यासंबंधी माहिती घेणे.	विभागामध्ये गेल्या दोन वर्षापासून कार्यवाही प्रलंबित आहे. भ.नि.नि. स्लिपाबाबत अधीक्षक, वेतन पथक यांनी लेखे पूर्ण करुन माहे-डिसेंबर २०१९ अखेर कार्यवाही पूर्ण करावी. शिक्षणाधिकारी यांनी तशा सूचना अधीक्षक, वेतन पथक यांना द्याव्यात. डी.सी.पी.एस. स्लिपाबाबत लेखाधिकारी अधीक्षक, वेतन पथक यांना लेखी पत्राद्वारे सूचना निर्गमित कराव्यात. तसेच माहे-डिसेंबर २०१९ पर्यंत स्लिपा वितरणाची कार्यवाही पूर्ण करावी.	शिक्षणाधिकारी / वेतन पथक स्तरावर	--
५	अर्धवेळ व डी.सी.पी.एस. शिक्षकांच्या सातव्या वेतन आयोगातील फरक बिलाचा पहिला हप्ता रोखीने केंव्हा मिळाणार? व तो दिवाळीपूर्वी देणेत यावा.	अनुदान मागणी करण्यात आली आहे. अनुदान उपलब्ध झाल्यास अर्धवेळ व डी.सी.पी.एस. शिक्षकांच्या सातव्या वेतन आयोगातील फरक बिलाचा पहिला हप्ता रोखीने अदा करणेत येईल. याबाबत शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून अधीक्षक, वेतन पथक यांना पत्राद्वारे सूचना निर्गमित करण्यात याव्यात.	शिक्षण उपसंचालक / वेतन पथक स्तरावर	--
६	नियमित वेतन श्रेणी मान्यता प्रकरणे आपल्या कार्यालयीन स्तरावर प्रलंबित आहेत काय? असल्यास त्या मान्यता कधी पर्यंत होणार?	सद्यस्थितीत ३१ नियमित वेतन श्रेणी मान्यता प्रकरणे संबंधीतांकडून त्रुटी पूर्तते आभवी प्रलंबित आहेत. त्रुटी पूर्ततेसाठी सबंधीतांना त्रुटीपत्रे निर्गमित करण्यात आली आहेत.	--	--
७	शालार्थ आय.डी. मिळूनही ज्याचे वेतन शालार्थ प्रणालीकडून होत नाही अशी काही उदाहरणे आहेत काय? माहिती मिळावी, असल्यास अशा शिक्षकांचे वेतन ऑफलाईन पध्दतीने काढावे.	अर्धवेळ शिक्षकांना पूर्णवेळ पदावर मान्यता मिळाल्यानंतर शालार्थ प्रणालीतून वेतन निघण्यास तांत्रिक अडचणी निर्माण होत आहेत. तसेच दोन अर्धवेळ पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा पूर्णवेळ पदावर वेतन काढण्याबाबतसुध्दा अडचणी निर्माण झालेल्या आहेत. अर्धवेळ शिक्षकांना पूर्णवेळ पदी मान्यता मिळाली. परंतु, त्याचा ७ व्या वेतन आयोगानुसार वेतन होत नाही. अर्धवेळ शिक्षकांना पूर्णवेळ पदी मान्यता आहेत अशा शिक्षकांच्या बाबतीमध्ये शालार्थ प्रणालीमध्ये अद्याप टॅब उपलब्ध झालेला नाही. शालार्थ प्रणालीमध्ये टॅब उपलब्ध होताच ७ व्या वेतन आयोगानुसार वेतन अदा करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. उच्च माध्यमिक चे शालार्थ आय.डी. चे प्रस्ताव अध्यक्ष, विभागीय राज्य मंडळ यांचेकडे मंजूरीसाठी पाठविण्यात येतात.	शिक्षण उपसंचालक स्तरावर	--

		कार्यालयास स्तरावर प्रलंबित असलेली शालार्थ प्रकरणे ही पुढील कार्यवाहीसाठी अध्यक्ष, विभागीय राज्य मंडळ यांचेकडे पाठविण्यात आलेली आहेत. तसेच नव्याने प्राप्त झालेल्या प्रस्ताव सद्या कार्यवाहीत आहेत.		
८	ज्या अर्धवेळ शिक्षकांना संस्थेने पूर्णवेळ कार्यभारावर नियुक्ती दिलेली आहे अशा शिक्षकांच्या मान्यता आपल्या स्तरावर प्रलंबित आहेत काय? माहिती घेणे.	सद्यस्थितीत अर्धवेळ शिक्षकांना संस्थेने पूर्णवेळ कार्यभारावर नियुक्ती दिलेली आहे अशा साधारणतः १८ शिक्षकांच्या मान्यता प्रस्ताव प्रलंबित आहेत.	शिक्षण उपसंचालक स्तरावर	--
९	पेंन्शन प्रकरणे वेळेत सादर होवून शिक्षकांना सेवानिवृत्त झाल्यानंतर लगेचच पेंन्शन मंजूर होणेसाठी शासन निर्णयानुसार कार्यवाही होते का? माहिती घेणे व असे होत नसल्यास संबंधीतांवर काय कारवाई होवू शकते याची माहिती घेणे.	अधीक्षक, वेतन पथकाकडून प्रस्ताव शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडे वेळेत पाठविले जात नसल्याबाबत संघटनेकडून सांगण्यात आले. शाळांकडून ऑनलाईन संच मान्यतेसाठी भरण्यात येणाऱ्या माहितीच्या आधारे दि.३१ मे २०२० रोजी सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांची यादी तयार करण्यात यावी. याबाबत लेखाधिकारी, शिक्षण उपसंचालक कार्यालय यांनी दि. ३० मे २०२० रोजी सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्याबाबत सेवानिवृत्तीचे प्रस्ताव मागविण्याची कार्यवाही करावी. जेणेकरुन सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती दिवशी त्यांचे सर्व देय लाभ देता येतील. शिक्षण उपसंचालक स्तरावर प्रलंबित असणाऱ्या साधारणतः ५० सेवानिवृत्तीच्या प्रस्तावांवर कार्यवाही पूर्ण होत आली आहे.	शिक्षण उपसंचालक स्तरावर	--
१०	बदली, मान्यता, वरिष्ठश्रेणी मान्यता, निवडश्रेणी मान्यता प्रकरणे आपले कार्यालयीन स्तरावर प्रलंबित आहेत का? माहिती घेणे, चर्चा करणे.	सद्यस्थितीत बदली मान्यतेबाबत ३ प्रस्ताव प्रलंबित आहेत. १५ निवडश्रेणी मान्यता प्रकरणांबाबत संबंधीतांना त्रुटीपत्रे देण्यात आलेली आहेत. त्रुटी पूर्तता होतच सदरहू प्रकरणे निकाली काढण्यात येतील.	शिक्षण उपसंचालक स्तरावर	--
११	कायम विनाअनुदान तत्त्वावर सुरु असलेल्या किती शाळांचे मुल्यांकन पूर्ण झाले? अजूनही किती शाळांचे मूल्यांकन व या शाळांमधील शिक्षकांच्या मान्यता प्रलंबित आहेत?	पूर्वी पात्र घोषित झालेले ४३ प्रस्ताव व नव्याने पात्र झालेले १८ प्रस्तावांवर कार्यवाही पूर्ण झाली असून ते पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येणार आहेत.	शिक्षण उपसंचालक स्तरावर	--
१२	आपल्या विभागात ऑगस्ट २०१९ मध्ये आयोजित केलेल्या मे २०१२ नंतर नियुक्त त्रूटी पूर्तता	माहे ऑगस्ट २०१९ मध्ये आयोजित केलेल्या त्रूटी पूर्तता शिबीरामध्ये एकूण ९७ प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. त्यामधील साधारणतः १०	शिक्षण उपसंचालक स्तरावर	--

	शिबीरामध्ये किती प्रस्ताव आले त्यामध्ये किती प्रस्ताव परिपूर्ण आहेत, माहिती मिळावी.	प्रस्तावांवर कार्यवाही पूर्ण झाली असून उर्वरित प्रस्तावाबाबत संबंधीतांकडून त्रुटीपूर्तता करुन घेण्यात काम सुरु आहे.		
१३	**ऐनवेळचे विषयः जिल्हावार-सातारा, सांगली, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व कोल्हापूर**			
➢	पाठ टाचणाची सक्ती करण्यात येवू नये.	ही धोरणात्मक बाब आहे. याबाबत शासन निर्णय दि. २२/०६/२०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. याबाबत संघटनेने राज्यस्तरिय होणाऱ्या बैठकीमध्ये चर्चा करावी.	शासन स्तरावर	--
➢	४२ दिवसांच्या रजा बाबत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.सातारा यांचेकडून कार्यवाही झाली नसल्याबाबत	शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून पत्र निर्गमित होवून देखील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.सातारा यांचेकडून कार्यवाही झालेली नाही. ४२ दिवसांचया रजा संबंधीतांच्या खात्यावर जमा करणेबाबत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.सातारा यांनी कार्यवाही करावी.	शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प.सातारा	--
➢	सन २०१९-२०२० सी.एच.बी. मान्यतेबाबत	शासनाकडून सन २०१९-२० साठी संचमान्यतेसाठी स्थगिती देण्यात आलेली असल्यामुळे संचमान्यता होणार नसल्यामुळे कार्यभाराची माहिती उपलब्ध होणार नसल्यामुळे नवीन सी.एच.बी मान्यता देता येणार नाही. सन २०१८-१९ च्या संचमान्यतेनुसार झालेल्या सी.एच.बी. मान्यता तशाच पुढे सुरु ठेवण्यात याव्यात	--	--
➢	**सर्वसाधारण सूचना :-**			
	संघटना अधिकृत असलेला पुरावे सादर करणे.	सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दि. २ जानेवारी २०१७ नुसार आपली संघटना अधिकृत असलेबाबचे पुरावे सादर करावे. अधिकृत असलेल्या संघटनेचीच बैठक पुढे आयोजित करण्यात येईल.	संघटना स्तरावर	--

(सत्यवान सोनवणे)
शिक्षण उपसंचालक
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर